ISSN 2231-0096

# Platinum

A Peer Reviewed National Multidisciplinary Journal




अथर्व

PRINCIPAL

ISSN 2231-0096

# Platinum

A Peer Reviewed
National Multidisciplinary Journal
Volume - 14 Number - 2 April-June 2023

(For this issue only)

**Chief Editor**
Principal Dr. Sharda J. Shitole

**Executive Editor**
Dr. Gajanan Patil

**Editors**
Dr. Rahul G. Saner
Dr. Atul P. Khose

**Advisory Editors**
Dr. Shyam Kayande, Nagpur
Dr. Shivankar S.N., Karnataka
Dr. Kishor Gaikwad, Mumbai
Dr. A. P. Khairnar, Nizampur
Dr. Kesha Phale, Amaravati
Dr. Ganesh Malte, Chikhali

**Managing Editor**
Mr. Yuvraj Mali

**Editorial Office**
**Atharva Publications**
Plot No.17, Devidas Colony
Varkhedi Road, Dhule - 424 001
**www.atharvapublications.com**
**E-Mail :** atharvapublications@gmail.com

**Branch :**
**Circulation & Advertisement**
**Atharva Publications**
Shop No. 2, Nakshatra Apartment, Shahu nagar Housing Society, Opp. Teli Samaj Mangal Karyalay, Jalgaon - 425001

**Subscription Rates**
Single Copy for reader Rs. 1000.00 or
US $ 100.00 Only (extra postage charge)
For Processing Charges of research Paper
Individuals Rs. 1500.00 (each research paper) Or
US $ 150.00
Institutions Rs. 3000.00 per annum Or Us $ 300.00

1. Editing of the research journal is processed without any remittance. The Selection and publication is done after recommendation of subject expert Refree.
2. Thoughts, Language vision and example in published research paper are entirely of author of research paper. It is necessary that both editor and editorial board are satisfied by the research paper. The responsibility of the matter of research paper is entirely of author.
3. Along with research paper it is compulsory to sent Memership form and copyright form.
4. In any condition if any National/ International university denies to accept the research paper published in the journal then it is not the responsiability of Editor, Managing Editor Publisher and Management.
5. Before re-use of published research paper in any manner, it is compulsory to take written acceptance form Managing Editor unless it will be assumed as disobedience of copyright rules.
6. All the legal undertaking related to this research journal are subjected to be hearable at Dhule Jurisdiction only.
7. The research journal will be sent by normal post. If the journal is not received by the author of research paper then it will not the responsibility of Editor and publisher. The amount or registered post should be given by the author of research paper. It will be not possible to sent second copy of research Journal.
8. Authors are requested to follow the author's Guide lines Contect Managing Editor - 9764694797

- For book reviews, please send two copies of the book (one for the Reviewer and other for the library of the journal) to the Managing editor.
- Donations of books /journals / cash / gift are welcome and will be gratefully acknowledged. All disputes concerning the journal will be settled in the court of Jalgaon, Maharashtra.

प्लॅटिनम या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक, आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखातील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकांवर राहिल.

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्स्च्यावतीने कार्यकारी संपादक श्री.युवराज माळी यांनी प्लॉट नं.१७, देविदास कॉलनी, धुळे-४२४ ००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व अविष्कार ग्राफीक्स, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाईल : ९४०५२०६२३०, जळगाव (ऑ.) : ०२५७-२२३९६६६.

PRINCIPAL
Dr. B. S. Desale Science College

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

and

Shirpur Education Society's

## Smt. H. R. Patel Arts Mahila College, Shirpur Dist : Dhule [M.S.]

Jointly organize.

## One-Day National Conference

on

# "Women Empowerment : Issues and Strategies"

**Wednesday, 29 March 2023**

Chief Editor

**Principal Dr. Sharda J. Shitole**

Executive Editor

**Dr. Gajanan Patil**

Editors

**Dr. Rahul G. Saner** **Dr. Atul P. Khose**

Sakri (Dhule)

PRINCIPAL
C.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

- कबचौउमवि, जळगाव संलग्नित महाविद्यालयातील महिला ग्रंथपालांनी नियतकालिकात लिखाण केलेल्या संशोधन लेखांचा अभ्यास ........ १७३
  - *श्री. प्रदीप तुळशिराम पाटील*
  - *डॉ. तुषार मल्हारराव पाटील*
- मराठी साहित्यातील १९९० नंतरच्या मुस्लिम लेखकांच्या मराठी कथा लेखनातील स्त्रियांचे समाजजीवन ........ १७६
  - *रोहीत वाडिले*
- भारतीय समाजातील स्त्री-पुरूष समानता ........ १७९
  - *प्रा. डॉ. योगिता बारी*
  - *श्री. राजेंद्र भटू पाटील*
- स्त्री प्रतिमा : साहित्य आणि प्रसारमाध्यमे ........ १८२
  - *प्रा. डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील*
- भारतीय इतिहास आणि महिलांची भूमिका ........ १८४
  - *पवार गोविंद नारायण*
  - *डॉ. अतुल पद्‌माकर खोसे*
- महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे महिलांच्या सबलीकरणातील योगदान ........ १८६
  - *कु. गायत्री जवाहरलाल तेली*
  - *डॉ. मनिषा जगदीशलाल वर्मा*
- स्त्रीवाद आणि महिला सक्षमीकरण काळाची गरज ........ १८८
  - *पुनम दिलीप गोसावी*
- २१ व्या शतकातील महिला सक्षमीकरणाची वाटचाल ........ १९०
  - *डॉ. राहुल गोपीचंद सनेर*
- नोकरी करणाऱ्या महिलांचे मानसिक सक्षमीकरण ........ १९३
  - *डॉ. योगिता बारी*
  - *श्रीमती प्रभाबाई सर्जेराव पाटील*
- स्त्रीवाद आणि महिला सक्षमीकरणाचे स्वरूप ........ १९५
  - *डॉ. मनिषा जगदीशलाल वर्मा*
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि महिला सक्षमीकरण ........ १९९
  - *श्री. आदिनाथ गोपीनाथ दरंदले*
  - *डॉ. हेमकांत मगन चौधरी*
- महिला सक्षमीकरण ........ २०१
  - *डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर*
- लिंगभाव असमानता : पैलू, आव्हानं आणि धोरणात्मक बदल ........ २०४
  - *डॉ. कविता डी. धर्माधिकारी*
  - *लक्ष्मी विनय आंभोरेकर*
- लैंगिक असमानता : भारतीय समाजातील समस्या आव्हाने आणि संधी ........ २०७
  - *प्रा. डॉ. एच. आर. चौधरी*
  - *चव्हाण गणेश शंकरराव*
- महिला सक्षमीकरणासाठी स्त्रीवादी दृष्टिकोन ........ २१०
  - *डॉ. रवींद्र विठ्ठल मोरे*
- महिला सक्षमीकरण ........ २१२
  - *डॉ. कमलाकर रमण पाटील*




Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College
Sakri, Tal. Sakri, Dist. Dhule

*Platinum* ISSN 2231-0096 Volume - 14 Number - 2 April-June 2023

# Index


- **An Analytical Study of Female Characters in Arun Kolatkar's *Jejuri* and *Sarpa Satra*** .......... 9
  *- Dr. V. M. Patil*
- **Feminist Study of Urmila Pawar's The Weave of My Life (Aaydan )** .......... 11
  *- Mr. Krishna Rohidas Sandanshiv*
- **Girish Karnad's Naga-Mandala- A Representation of Gender Main Streaming Writing** .......... 13
  *- Mr. Bharat Sonar*
- **The Relationship between Social Intelligence and Happiness among Adolescents in Nashik District** ... 16
  *- Mr. Sandip Gaikwad*
  *- Dr. Ravindra More*
- **Plot and Women Characters in Gabriel Garcia Marquez's One Hundred Years of Solitude** .......... 19
  *- Dr. Hemant Govindrao Pawar*
- **Thoughts on Women Liberation in Therigatha** .......... 22
  *- Dr. Jitendra B. Patil*
- **Women Leadership in Sports : Branding and Media a Review** .......... 25
  *- Dr. Limbaji Pratale*
- **Gender Issues in Arundhati Roy's The God of Small Things and Shobha De's Starry Nights** .......... 28
  *- Dr. Vijay Songire*
- **Labyrinth of Female Character and Protagonist : The Study of Arun Joshi's Novels** .......... 31
  *- Dr. Pavan Chudaman Patil.*
- **An Impact on Social Media of Women Empowerment** .......... 34
  *- Dr. Yogini P. Dhakad*
- **Indian English Literature and Place of Women in Trirchal Society** .......... 38
  *- Dr. Umesh Yashwantrao Gangurde*
- **An Investigation Overview Study on Government Policies towards Women Empowerment** .......... 41
  *- Dr. Dinesh D.Bhakkad*
- **Women Empowerment : Issues, Challenges and Opportunities** .......... 45
  *- Dr. Priya Narendra Kurkure*
- **Kamala Markandaya's Rukmani, an Embodiment of Unending Feminine Struggle** .......... 49
  *- Dr. Gajanan Pandurang Patil*
- **Women Empowerment - Issues & Strategies** .......... 52
  *- Gokul Mahajan*
- **Women in the Novels of Shashi Deshpande** .......... 54
  *- Prof. Smt. Hemangi Ratanakar Kulkarni*
- **Mahatma Gandhi's Freedom Movement and Women's Participation** .......... 56
  *- Prof. Dr. H. R. Chaudhari*
- **A Survey on Importance of Education for Women Empowerment in India** .......... 59
  *- Jayshri Tarachand Patil, Dr. Rahul Gopichand Saner*
- **The Status of Women in 21st Century and Their Empowerment : The Real Picture** .......... 62
  *- Mr. Arun Ambu Patil, Dr. Gajanan P. Patil*
- **Gender Inequality in Indian Society : Causes and Awareness** .......... 64
  *- Mr. Deepak Arjun Mali, Dr. Umesh Gulabrao Pat*


Sakri (Dhule)
PRINCIPAL
P.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

# स्त्री प्रतिमा : साहित्य आणि प्रसारमाध्यमे

– प्रा. डॉ. वसुमती पुंडलिकराव पाटील
साक्री. जि. धुळे

### साहित्य आणि स्त्री

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घडलेल्या परिवर्तनाने भारतीय सांस्कृतिक जीवनामध्ये विशेषतः स्त्रीजीवनात अनेक आमूलाग्र बदल घडून आले, या काळात स्त्रीचे व्यक्तिमत्व मग ते सामाजिक सांस्कृतिक व कौटुंबिक दृष्टीने असणारे अस्तित्व पूर्णतः बदलले. समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. त्याच बरोबर स्त्रीला देखील स्व सन्मान, स्व जाणीव निर्माण झाल्याने स्वतःच्या जीवनाशी निगडित परीघाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन प्राप्त झाला. इतकेच नव्हे तर स्त्रीला स्वतःच्या अंगी असलेल्या अनेक क्षमता, अनुभूती, सामर्थ्य ओळखता आले आणि स्त्रीने विविध क्षेत्रात यशस्वी पदार्पण केले. स्त्रीच्या या यशस्वी वाटचालीसाठी तिच्या सभोवतालची सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण जसजसे बदलत गेले, शिक्षणविषयक सुविधा आणि संधी उपलब्ध होत गेल्या त्यानुसार स्त्री आपले यशस्वी पाऊल पुढे टाकत गेली.

साहित्य आणि समाज यांचा घनिष्ठ संबंध असतो. समाजातून साहित्य व साहित्यातून समाज दर्शन घडविण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. साहित्यिक हा समाजाचाच एक घटक असून त्याची संवेदनशीलता, जीवनविषयक दृष्टिकोण, व्यासंग व जीवनातील नाविन्याला सामोरे जाण्याची वृत्ती या सर्व बाबींचे प्रतिबिंब त्याच्या साहित्य कृतीतून दिसून येते. साहित्यात समाजाचे वास्तव आणि काल्पनिक प्रतिबिंब पडलेले असते. समाजातील परिवर्तन साहित्यातू दिसून येत असते. साहित्यातून नवी सामाजिक संबंध दृढ होत असतात. प्रत्येक कालखंडात जन्मास आलेले साहित्य त्या त्या कालखंडाचे समाजाचे विविध रूपांचे दर्शन घडवीत असते. स्त्रीवादी साहित्य स्त्रियांचे माणूसपण जागे व्हावे या भावनेतून जन्मास आले. ब्रिटिशांच्या काळात स्त्रीवादी चळवळीला धुमारे फुटले. स्वातंत्र्यपूर्व काळानंतर समाज स्थित्यंतरे झाली. स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य अशा अनेक बाबतीत सुधारणा झाल्यामुळे स्त्रीही 'एकच प्याला' नाटकातील सिंधू न राहता स्त्री म्हणून साहित्यातून व्यक्त होऊ लागलली. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी कादंबरी विकसित झाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबऱ्यांमध्ये जे स्त्री जीवन चित्रीत झालेले आहे ते शक्यतोवर पांढरपेशी वर्गातील स्त्रियांच्या बाबतीत दिसून येते. स्त्रीची होणारी कुचंबणा, बालविवाह, पुनर्विवाह, विधवेची विटंबना असे स्त्रीचे चाकोरीबद्ध जीवन व स्त्रियांच्या आयुष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचे चित्र अधिक प्रमाणात दिसून येते. त्यासोबतच स्त्री शिक्षणाची सुरुवात झालेली असल्यामुळे त्याबाबतीत देखील अनुकूल प्रतिकूल प्रतिक्रियांमुळे स्त्रियांना पडलेल्या मर्यादा देखील कादंबऱ्यांमध्ये चित्रित झालेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळ नवचैतन्य निर्माण करणारा आणि आत्मविश्वास जागृत करणारा असल्यामुळे समाजात परिवर्तन दिसून येऊ लागले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री अन्यायाचे चित्र बहुतांश साहित्यांमधून दिसून येत होते. तिच्या मनाची अस्वस्थता, कोंडमारा स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात वैचारिक आणि ललित साहित्यातून प्रकट झाले. पुढे स्त्रिया शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करू लागल्यामुळे स्त्रियांची लेखणी आपले अनुभव व्यक्त करू लागली. विशेषतः साठोत्तरीच्या काळात मराठीत ग्रामीण साहित्य व दलित साहित्य हे महत्त्वाचे प्रवाह झाल्याने त्यांच्यामध्ये देखील स्त्री प्रतिमा आपले वेगळेपण घेऊन आले. साहित्य वास्तवाला धरून आकारास आले .श्री. ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू', उद्धव शेळके यांची 'धग', महानोर यांची 'गांधारी' की मग रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' कादंबरी असो यामध्ये प्रत्येक स्त्रीचे चित्रण धाडसी, सहनशील, मर्यादेला धरून संसार रेटणारी असे वास्तव चित्रण दिसून येते. कालानुक्रमे होणारा विकास पाहणे प्रेरणादायी असते स्त्रियांच्या वाटचालीत शैक्षणिक प्रगतीबरोबर स्त्रियांना जेव्हा विविध समस्यांचे भान येऊ लागले तेव्हा अन्यायविषयी स्त्रिया व्यक्त होऊ लागल्या. नवे विचार व्यक्त करू लागल्या. स्त्रियांचे वाङ्मय लेखन स्त्रियांच्या बौद्धिक मानसिक विकासाचा टप्पा ठरला. स्त्री कादंबरीकारांच्या लेखनात स्त्रीचे दुःख भरभरून येऊ लागले. विशेषतः स्त्रियांच्या लेखनात स्त्री तिची आसक्ती, तिचे सौंदर्य तिची जुळवून घेण्याची भूमिका या सर्व बाबींचे चित्रण साहित्यात दिसून येते.

### प्रसार माध्यम आणि स्त्री

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात प्रसार माध्यमांशिवाय जीवन जणू अर्थहीन झाल्यासारखे भासते. प्रसार माध्यमातील 'प्रसार' या शब्दाचा अर्थ जेव्हा कोणताही भाव विचार किंवा माहिती इतरांपर्यंत पोहोचविणे हा होतो. तसेच वाचक, प्रेक्षक आणि ग्राहक यांनी अशा प्रसार माध्यमांकडे आकृष्ट व्हावे हा त्यामागील हेतू दिसून येतो. अलीकडे प्रसार माध्यमांची सूत्रे राजकारणी लोकांच्या हातात गेलेली दिसतात.

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रसार माध्यमांचे प्रस्त अत्यंत वाढलेले आहे. प्रसार माध्यमांमुळे जगातील मानवी समूह एका सूत्रात बांधले जातात त्याचे कारण म्हणजे विश्वातील मानवी समूह समाजधर्म, राजकारण, अर्थकारण, शिक्षण इत्यादी सर्व गोष्टींवर प्रसार माध्यमांचा प्रभाव आहे. विज्ञान-तंत्रज्ञानामुळे प्रसार माध्यमांमध्ये आमुलाग्र बदल



Sakri (Dhule)
PRINCIPAL
Smt. ... U.Patil Arts & ... Dr. B.S. Desale Science College

झालेला दिसून येतो. मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवाला आपल्या भौतिक सुख सोयींबरोबरच मानसिक समाधानासाठी मनोरंजनासाठी समाजाशी एकरूप राहणे गरजेचे असते. मानवी जीवनात आवश्यक त्या गोष्टींचा विचारांचा मतांचा अनुभवांचा प्रसार त्यांची देवाण-घेवाण होणे नितांत गरजेचे झाले आहे. आज कोणतीही बातमी, सूचना, माहिती, ज्ञान क्षणात जगाच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत सहजपणे पोहोचू शकते कारण आज जग जवळ आले आहे असे सहजपणे म्हटले जाते. त्याचे श्रेय प्रसार माध्यमांना आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय, सांस्कृतिक विकास आणि प्रगतीमध्ये प्रसार माध्यमांचा मोलाचा वाटा आहे. प्रसारमाध्यमांमध्येटीव्ही, रेडिओ, वृत्तपत्र, सिनेमा, इंटरनेट इत्यादींचा समावेश होतो. विशेष म्हणजे जाहिरात आणि मनोरंजन या दोन महत्त्वपूर्ण गोष्टींसाठी प्रसार माध्यम अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडताना दिसतात. मनोरंजनामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनापासून काही क्षण काळ विरंगुळा मिळत असतो. आजचे युग जाहिरातीचे युग आहे असे म्हटले जाते. प्रसार माध्यम आणि जाहिरात याचे अतूट बंधन आहे. सर्वसामान्य माणसाला उत्पादन त्याची प्रतवारी, याची उपयोगिता, किंमत इत्यादी विषयाची माहिती जाहिरातद्वारा कळत असते. प्रसार माध्यमे हे संरक्षक म्हणून देखील काम करतात. जसे की येणारे संकट, आपत्ती, प्रसंग याविषयी आधीच सजगता म्हणून आपणास माहिती मिळत असते. अशा या प्रसार माध्यमांमध्ये स्त्री प्रतिमा विविध अंगाने प्रतिबिंबित होताना दिसते.

आज फक्त टेलिव्हिजनचा विचार केला तर अगदी वृत्त निवेदीकेपासून प्रारंभ होतो. स्त्रीचे संवाद कौशल्य आत्मविश्वास वाढीस लागते. रोजगाराचे एक नवीन क्षेत्र त्या निमित्ताने स्त्रियांसमोर उपलब्ध झाले आहे. आरोग्य, कौटुंबिक मनोरंजन, शैक्षणिक, नृत्यगायन इत्यादी विषयांवरचे कार्यक्रम स्त्रियांना उपयुक्त माहिती पुरवीत असतात. रेडिओ वृत्तपत्र विविध प्रकारचे मासिक यामध्ये येणाऱ्या बातम्या वृत्त विविध विषयांवरील लेख माहिती याद्वारा समाजाचा आरसा स्पष्टपणे दिसतो. आज सामाजिक वातावरण दूषीत झालेले दिसते.जसे की आत्महत्या, विवाह संस्था डळमळीत, हुंडाबळी, समलैंगिकता, विवाह न करता एकत्रित राहणे इत्यादी अनेक प्रश्न समस्या समोर येऊ लागले आहेत. प्रसार माध्यमांमुळे स्त्री या विषयीस भान जागरूक होऊ शकते. भावी पिढी पुढे येणाऱ्या अडचणी समस्यांयांना तोंड देण्याचे सामर्थ्य स्त्री निर्माण करू शकते. प्रसार माध्यमांमध्ये विशेषतः दिसून येणारी एक बाब म्हणजे जाहिरात. त्यातही जाहिरातींमध्ये महिलांचा सहभाग अधिक दिसून येतो. जाहिराती बाबतीत स्त्रियांचे अंगप्रदर्शन हा एक आक्षेप वगळता दुसरी बाजू जाणवते की जाहिरातीमुळे वस्तूचा दर्जा, प्रतवारी, किंमत इत्यादी कळत असते. विशेषतः बहुतांश कार्यक्रमांमध्ये जाहिराती अधिक दाखविल्या जातात अशावेळी महिला कुटुंबा समवेत बसून जेव्हा कार्यक्रम पाहत असतात तेव्हा स्त्रियांच्या जाहिरातीमधील अंगप्रदर्शन हे अयोग्य ठरते तेव्हा जाहिरातींमध्ये स्त्रियांचा सहभाग कमी असावा असे अधिकांश महिलांचे मत आहे परंतु खूप कमी महिला मानतात की महिलांनी जाहिरात केल्यामुळे त्या वस्तूंचा खप वाढतो हा विषय वादप्रतिवादाचा असला तरी एक बाबत मात्र निश्चित दिसून येते की नवनवीन उत्पादनांविषयीची माहिती प्रसार माध्यमांमुळे ज[illegible] रूपाने मिळत असते. महिला प्रसार माध्यमांकडे अधिक आकृष्ट किंवा प्रभावित होताना दिसतात या बाबतीत दुमत नाही. स्त्रियांचे रोजच्या दैनंदिन जीवनापासून वेळ बाजूला काढून मनोरंजन देखील होत असते. प्रसार माध्यमांद्वारा पारिवारिक मनोरंजन खेळ, पाक कला स्पर्धा, बक्षिसे इत्यादी सदरांवर, योजनांवर आधारित कार्यक्रम आयोजित केले जातात त्यामागे खरेदी विक्री आणि मनोरंजन हा व्यवसायिक दृष्टिकोन दिसून येतो अशा विविध कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग अधिक दिसतो. नोकरी करणाऱ्या महिला असो किंवा गृहिणी असो वेळ मिळाल्यास त्या प्रसारमाध्यमांचा सहज आधार घेतात. एकूणच आज महिला वर्ग फक्त स्त्री स्वतंत्रता, स्त्री समानता, स्त्री रोजगार इत्यादी संकुचित विषयांमध्ये बंदिस्त राहिलेली नाही. त्या सर्व बाबींच्या पलीकडे जाऊन सर्वत्र समाज प्रगतिशील मानवी मूल्य जपणारे संस्कृतीचे जतन संवर्धन करण्यासाठीच प्रसार माध्यमांचा सकारात्मक प्रभाव त्यांच्यावर दिसून येतो आहे.

प्रसार माध्यमांमध्ये एवढी ताकद आहे की निरपराध माणसाला ते गुन्हेगार ठरू शकतात आणि गुन्हेगार माणसाला निरपराध. कारण लोकांच्या मनावर तावा मिळविण्याचे काम प्रसार माध्यम प्रभावीपणे करीत असतात. विशेष म्हणजे टीव्ही, रेडिओ, सोशल मीडिया वृत्तपत्र, इंटरनेट, वेबसाईट, चित्रपट अशी माध्यमांची विविध रूपं माणसाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाली आहेत. समाजाचे प्रतिबिंब माध्यमांमध्ये पाहायला मिळतं. एखादी गोष्ट माध्यमांमधून सातत्याने दाखवत राहिले की लोकांना ती खरी वाटू लागते. माध्यमांमधील स्त्री प्रतिमा दोन टोकांमध्ये विभागलेली आहे. भारतीय संस्कृती जपणारी प्रसंगी दुर्गा होणारे स्त्री तर दुसऱ्या बाजूने त्याच स्त्रीच्या देहाचे उत्तम प्रदर्शन माध्यमांमधील या दोन भिन्न प्रतिमांचा परिणाम स्वतः स्त्रीच्या आयुष्यावर होताना दिसतो भिन्न प्रतिमांना भेदून बाहेर पडलेलीच स्त्री आयुष्यात काही करू शकते परंतु हा लढा सोपा नसतो त्यावर असे संघर्ष लढा माध्यमातून दाखवीत नाही. सोशल मीडियामुळे माहितीची देवाण घेवाण ही केवळ काही सेकंदांवर आली आहे. सोशल मीडियाच्या वाढत्या वापरानंतर स्त्रियांचे चित्रण खालच्या पातळीवर गेलेले दिसते. पारंपरिक माध्यम म्हणून वर्तमानपत्राचा आणि आधुनिक अशा न्यूज चॅनेलचा ~~विचार केला~~ तरी तेथेही महिलां मध्ये त्यांच्या सामाजिक-आर्थिक, शहरी ग्रामीण स्तरावरून भेदभाव केला जातो. कोणत्याही देशाची व्यवस्था विकासक्षम पद्धतीने चालविण्यासाठी प्रसार माध्यमांची आवश्यकता आहे.


संदर्भ

१) ताराबाई शिंदे 'स्त्री पुरुष तुलना' पुणे.

२) आ. ह. साळुंखे, 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' लोकवाङ्मयगृह मुंबई, आवृत्ती दुसरी जुलै १९९३.

३) चंद्रकांत बांदिवडेकर, 'मराठी कादंबरीचा इतिहास' मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, ऑक्टोबर १९९६.

४) स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, संपादक: डॉ. स्वाती कर्वे.

५) प्रकाश बोबडे, 'भारतीय समाज रचना पारंपरिक व आधुनिक' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) गुरुनाथ नाडगोंडे, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९७८.




Sakri (Dhule)
PRINCIPAL
P.S.G's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College